**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ श्री.माधव भागवत कोल्हाळ यांचा सरतपास फिर्यादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.ए.हासे यांचे मार्फत</u>**

**७.** आरोपीने मला दिनांक ०२.१०.२०१६ रोजी दिलेला रक्कम रु.१,५०,०००/– चा धनादेश मी याकामी निशाणी ५२, अ.क्र.१ वर दाखल केला आहे. आता मला तो धनादेश दाखविला. तो धनादेश तोच आहे. त्या धनादेशावर आरोपीची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या धनादेशातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५३** देण्यात आली.

८. आता मला निशाणी ३, अ.क्र.२ वरील चेक रिटर्न मेमो दाखविला. तो मेमो तोच आहे. त्या मेमोवर आय.सी.आय.सी.बँक संगमनेर यांचा शिक्का व संबंधित अधिकारी यांची सही आहे. त्या मेमोमधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५४** देण्यात आली.

**९.** आता मला निशाणी ३, अ.क्र.३ वरील नोटीसीची स्थळ प्रत दाखविली. ती स्थळ प्रत अस्सलबरहुकूम आहे. त्या नोटीसीवर माझे वकील एस.एफ.शेख यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या नोटीसीमधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५५** देण्यात आली.

**१०.** आता मला निशाणी ३, अ.क्र.४ वरील पोस्टाची पावती दाखविली. ती पावती दिनांक ०६.०१.२०१७ रोजीची आहे. ती पावती तीच आहे. त्या पावतीतील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५६** देण्यात आली.

**११.** आता मला निशाणी ३, अ.क्र.५ वरील सब पोस्ट मास्टर, संगमनेर यांनी दिलेला चौकशी अहवाल (Enquiry Particulars) दाखविला. तो अहवाल तोच आहे. त्या अहवालावर सब पोस्ट मास्टर यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५७** देण्यात आली.

**१२.** आता मला निशाणी ५२, अ.क्र.२ वरील मूळ साठेखत दाखविले. ते साठेखत आरोपीने मला लिहून दिले आहे. त्या साठेखतावर माझी, आरोपीची आणि साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्या सर्व सह्या मी ओळखतो. त्या साठेखतातील मजकूर मी व आरोपीने सांगितल्याप्रमाणे लिहिला आहे. तो मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५८** देण्यात आली.

**१३.** आता मला निशाणी ५२, अ.क्र.३ वरील नोटीसीची स्थळ प्रत दाखविली. ती स्थळ प्रत अस्सलबरहुकूम आहे. त्या नोटीसीवर माझे वकील श्री.व्ही.आर.पगारे यांची सही व शिक्का आहे. ती सही मी ओळखतो. त्या नोटीसीमधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–५९** देण्यात आली.

**१४.** आता मला निशाणी ५२, अ.क्र.४ वरील नोटीसीची स्थळ प्रत दाखविली. ती स्थळ प्रत अस्सलबरहुकूम आहे. त्या नोटीसीवर माझे वकील एस.एफ.शेख यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या नोटीसीमधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी सी–६०** देण्यात आली.

**सरतपास पूर्ण.**

**(आरोपीतर्फे निशाणी ६१ वर देण्यात आलेल्या मुदत अर्जावरील आदेशानुसार प्रकरण उलटतपासाठी तहकूब.)**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**दिनांक – ०८.१२.२०२५** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोले,**
**ता.अकोल, जि. अ.नगर**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ श्री.माधव भागवत कोल्हाळ यांचा उलटपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.वाय.एन.पांडे यांचे मार्फत–</u>**

**१५.** माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीमध्ये सुकेवाडी येथील सि.स.नं.३२७ ही घर मिळकत खरेदी करणेचा व्यवहार झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या व्यवहारानुसार झालेल्या साठेखताप्रमाणे आरोपीने मला खरेदीखत पूर्ण करुन द्यायचे, असे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२.०१.२०१६ रोजी मी खरेदीखत करून घेणेसाठी दुय्यम निबंधक, संगमनेर यांचे कार्यालयात गेलो होतो. मी त्या दिवशी खरेदीखताचा दस्त तयार केलेला नव्हता. आरोपीने मला खरेदीखत पूर्ण करून द्यावे, या कारणासाठी मी आरोपीविरुध्द दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावे खरेदीखत पूर्ण होवून मिळावे म्हणून मी साठेखतावरील साक्षीदार यांचेकडे कधीही मागणी केलेली नाही.

**१६.** मी आरोपीला त्या खरेदी व्यवहारापोटी रोख रक्कम रु.२,५०,०००/– दिली, याबाबतचा तपशील मला सांगता येईल. मी आरोपीला सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कळस बु. या बँकेकडील रक्कम रु.२,००,०००/– चा चेक दिला होता व रक्कम रु.५०,०००/– रोख दिली होती. मी आरोपीला रक्कम रु.२,००,०००/– चेक ने दिली होती, असे माझे फिर्यादीमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला दिलेल्या रक्कमेचा तपशील याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोणत्याही रक्कमेबाबत केव्हाही कोणताही चेक दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणी दाखल असलेल्या चेकवर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपीमधील व्यवहार हा दिवाणी स्वरुपाचा असताना देखील निव्वळ आरोपीचा हरवलेला चेक मला मिळाल्याने त्याचा गैरफायदा घेवून मी आरोपीविरुध्द ही खोटी केस दाखल केली. हे

म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कोणतीही रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा मला खरेदी व्यवहार पूर्ण करून देण्यास तयार असताना देखील निव्वळ त्याला त्रास देण्यासाठी मी त्याचेविरुध्द ही खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझेशी झालेला खरेदी व्यवहार रद्द केलेला असताना देखील मी त्याचेविरुध्द ही खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.01.06 18:18:05 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – ०५.०१.२०२६** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोले,**

ता.अकोल, जि. अ.नगर